क्रेडिट कार्ड संबंधित अटी

1	तुमच्यासाठी योग्य असलेले उत्पादन निवडताना	2
2	क्रेडिट कार्ड	2
3	क्रेडिट मर्यादा	4
4	आगाऊ रोख	5
5	बॅलेन्स ट्रान्सफर	5
6	व्याज, शुल्क आणि प्रभार	5
7	दायित्व	6
8	तुमच्या खात्यासाठी अतिरिक्त सेवा	7
9	पेमेंट्स	9
10	ओव्हरसीस व्यवहार	11
11	रद्द किंवा समाप्त करणे	12
12	तफावत	13
13	संशयास्पद व्यवहार	14
14	कार्डचे नूतनीकरण आणि बदल (रिन्यूव्हल)	14
15	जर तुम्ही परदेशी नागरिक असाल	15
16	शब्दांचा अर्थ	15

महत्वाची सूचना

तुम्ही हा दस्तऐवज वाचणे अत्यंत आवश्यक आहे. ज्याद्वारे आम्ही तुम्हाला क्रेडिट कार्ड उत्पादने प्रदान करण्यास अनुमती देणार आहोत, त्यासंबंधित अटी व शर्ती या दस्तऐवजात आहेत. आमच्या ग्राहक अटी, उत्पादन माहितीपत्रक आणि आमच्या बँकिंग कराराची रचना करणाऱ्या इतर कोणत्याही दस्तऐवजांसह तुम्ही ते वाचले पाहिजे. या अटी आणि आमच्या ग्राहक अटींमध्ये कोणतीही विसंगती आल्यास, या अटी प्रबळ ठरतील. आमच्याकडे असलेल्या तुमच्या कोणत्याही विद्यमान क्रेडिट कार्ड उत्पादनांना या अटी लागू होत नाहीत, कारण ते स्वतंत्र अटी व शर्तींच्या अधीन आहेत.

मुख्य शब्द (कीवर्ड्स)

यासारख्या मुद्रित केलेल्या मुख्य शब्दांचा आणि आमच्या बँकिंग करारामध्ये वापरलेल्या इतर शब्दांचा अर्थ आमच्या ग्राहक अटींमध्ये समजावून सांगितला आहे. या अटींमध्ये संदर्भित असलेल्या उत्पादनांना लागू होणारे काही अतिरिक्त मुख्य शब्दांचा अर्थ या अटींच्या शेवटी समजावून सांगितला आहे.

1 तुमच्यासाठी योग्य असलेले उत्पादन निवडताना

आम्ही तुमच्या वैयक्तिक बँकिंग गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केलेली क्रेडिट कार्ड उत्पादने तुम्हाला प्रदान करतो. आम्ही प्रदान करत असलेल्या विशिष्ट प्रकारच्या क्रेडिट कार्ड उत्पादनाची माहिती या माहितीपत्रकात दिली आहे. जर तुम्हाला आमच्याकडून कोणत्याही काड्‌र्सवर लागू होणाऱ्या कोणत्याही वैशिष्ट्यांचे किंवा अटींचे स्पष्टीकरण मिळवण्याची गरज असेल तर कृपया आमच्याशी संपर्क साधा.

2. क्रेडिट कार्ड

क्रेडिट कार्ड जारी करणे

2.1 आम्ही तुम्हाला क्रेडिट कार्ड प्रदान करु तसेच तुमच्या विनंतीनुसार प्रत्येक अतिरिक्त (पूरक/सप्लिमेंटरी) कार्डधारकाला देखील क्रेडिट कार्ड प्रदान करु.

2.2 कृपया लक्षात घ्या की केवळ एका कार्डवर तुम्हाला अतिरिक्त (पूरक/सप्लिमेंटरी) कार्ड जारी केले जाणार नाही.

प्राप्त करणे

2.3 तुम्ही दिलेल्या पत्त्यावर आम्ही क्रेडिट कार्ड (आणि कोणतेही बदल केलेले क्रेडिट कार्ड) पाठवतो.

ॲक्टिव्हेशनची (सक्रियकरण) प्रक्रिया

2.4 प्रत्येक कार्डधारकाने वेळोवेळी सूचित केलेल्या कोणत्याही सक्रियकरण प्रक्रियेचे पालन करणे आवश्यक आहे.

क्रेडिट कार्डच्या प्रत्येक वापरावर आमच्या बँकिंग कराराच्या अटी लागू होतात. जर कार्डधारक त्या अटींशी सहमत नसेल, तर त्यांनी क्रेडिट कार्डसाठी स्वाक्षरी करु नये किंवा कोणताही व्यवहार करु नये.

क्रेडिट कार्डचा वापर

2.5 जेव्हा तुम्ही पहिल्यांदा क्रेडिट कार्ड वापरता तेव्हा तुम्ही आमच्या बँकिंग कराराच्या अटी स्वीकारता.

2.6 तुम्ही याची खात्री केली पाहिजे की ज्या व्यक्तीला क्रेडिट कार्ड जारी करण्यात आले आहे, त्या व्यक्तीनेच ते वापरावे. क्रेडिट कार्डचा वापर बँकेच्या नियामक मार्गदर्शक तत्वांनुसार, अटी व शर्ती आणि लागू धोरणांनुसार केला जात आहे याची खात्री करण्याच्या हेतूने एका स्टेटमेंट सायकलमध्ये मंज़ूर केलेल्या रकमेपेक्षा जास्त क्रेडिट मार्यादेचा वापर होत आहे की नाही, काही निवडक व्यापाऱ्यांकडून असामान्य किंवा जास्त वापर, व्यापाऱ्यांशी संभाव्य मिलीभगत आणि/किंवा वैयक्तिक / व्यावसायिक संबंधित नसलेल्या गरजांसाठी वापर, अवाजवी रिवॉर्ड पॉइंट्स / कॅशबॅक / इतर फायदे मिळवण्यासाठी वैशिष्ट्यांचा/ऑफर/कार्यक्रमांचा जास्त वापर/गैरवापर होत आहे की नाही हे ओळखण्यासाठी बँकेकडे क्रेडिट कार्डचा वापर वेळोवेळी तपासण्याचा अधिकार असेल. वापराच्या पद्धतींच्या आधारावर बँकेला यापैकी कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास बँक क्रेडिट कार्डवर प्रतिबंधात्मक कारवाई करु शकते. अशी कृती तत्काळ केली जाऊ शकते आणि वैशिष्ट्ये/फायदे काढून घेणे तसेच क्रेडिट कार्डची पूर्ण समाप्ती अशा कृती यात समाविष्ट असू शकतात परंतु यापर्यंत मर्यादित नाही. बँकेने अशी कोणतीही कारवाई केली तर क्रेडिट कार्ड पूर्ववत करण्यासाठी त्याचा प्रामाणिक वापर केल्याचा समाधानकारक पुरावा देण्याची जबाबदारी ग्राहकाची असेल आणि योग्य वाटतील अशी वैशिष्ट्ये/लाभ दिले जातील. या संदर्भात बँकेचा निर्णय अंतिम व ग्राहकांसाठी बंधनकारक असेल. अशा परिस्थितीत, कार्डधारकाने (कायद्याद्वारे आवश्यक असलेल्या कोणत्याही डिफॉल्ट किंवा इतर सूचनेच्या अधीन) खात्यातील एकूण थकबाकीची रक्कम स्टँडर्ड चार्टर्ड बँकेकडे त्वरित भरावी. यामध्ये करारांतर्गत बँकेच्या देय असलेल्या सर्व रकमांचा समावेश आहे, सर्व व्यवहार व खात्यावर अद्याप जे शुल्क आकारले गेले नाही अशा रकमांचा देखील समावेश असेल. कार्डधारकाने अशी सर्व देय रक्कम भरेपर्यंत कार्ड बंद झाले असे मानले जाणार नाही.

सप्लिमेंटरी कार्ड्स

2.7 आम्ही तुम्हाला कोणतेही सप्लिमेंटरी कार्ड्स, त्यांचा पिन/पासवर्ड आणि संबंधित सर्व माहिती पाठवतो.

2.8 आम्ही तुम्हाला किंवा कोणत्याही सप्लिमेंटरी कार्डधारकाला दिलेला कोणताही संदेश (कम्युनिकेशन), तुम्हा सर्वांना दिला आहे असे मानले जाईल.

2.9 तुम्ही आणि प्रत्येक सप्लिमेंटरी कार्डधारक तुमच्यापैकी कोणीही आम्हाला देत असलेल्या सूचनांचे पालन करण्यास सहमत आहात.

को-ब्रँड काड्र्स

2.10 आम्ही को-ब्रँड कार्डचे रुपांतर दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या क्रेडिट कार्डमध्ये करु शकतो.

2.11 आम्ही व्यवसाय सहयोगी भागीदाराने केलेल्या कोणत्याही प्रतिनिधित्व, जाहिराती किंवा दायित्वांसाठी जबाबदार असणार नाही.

विशेष व्यवस्थेद्वारे जारी केलेले कार्ड

2.12 जर क्रेडिट कार्ड एखाद्या असोशिएशनसह विशेष व्यवस्थेचा भाग म्हणून जारी केले गेले असेल तर आम्ही हे करु शकतो:

- आमच्या बँकिंग कराराच्या संबंधित माहिती असोशिएशन समोर उघड करु; आणि
- जर तुम्ही आमचा बँकिंग करार संपवला तर तुमचे असोशिएशनसोबत असलेले संबंध देखील संपेल. अधिक माहितीसाठी कलम 11.3 पाहा.

3 क्रेडिट मर्यादा

3.1 तुमचा अर्ज मंजूर झाल्यानंतर आम्ही तुम्हाला क्रेडिट मर्यादेबद्दल सूचित करतो. आम्ही क्रेडिट मर्यादा कधीही बदलू शकतो. तथापि तुमची क्रेडिट मार्यादा तुमच्या संमतीनेच वाढवली जाईल. क्रेडिट लिमिट बदलताना आम्ही कोणत्याही उत्पादनाच्या संबंधात तुम्ही दिलेल्या नवीनतम उत्पन्न माहितीचा विचार करु शकतो.

3.2 क्रेडिट कार्ड मर्यादा ही एकूण मर्यादा आहे, जी तुम्हाला जारी केलेल्या सर्व क्रेडिट काड्र्सना लागू होते. तुम्ही विनंती केल्यास आम्ही विशिष्ट क्रेडिट कार्डसाठी एकूण मर्यादेपेक्षा कमी मर्यादेची व्यवस्था करण्यास सहमती देऊ शकतो.

तुमची क्रेडिट मर्यादा ओलांडताना

3.3 क्रेडिट मर्यादा ओलांडली जाणार नाही याची खात्री करणे ही तुमची जबाबदारी आहे.

3.4 क्रेडिट मर्यादा ओलांडली आहे की नाही याची गणना करताना, आम्ही या गोष्टी विचारात घेऊ शकतो:

- क्रेडिट कार्ड वापरुन केलेला कोणताही व्यवहार, परंतु क्रेडिट कार्डच्या खात्यातून डेबिट झाला नाही; आणि
- क्रेडिट कार्डचा वापर करुन प्रस्तावित व्यवहारासंदर्भात आम्ही तृतीय पक्षाला दिलेली कोणतीही अधिकृतता:

क्रेडिट मार्यादा ओलांडली

3.5 जर तुम्ही क्रेडिट मर्यादा ओलांडली असेल किंवा कोणत्याही तात्पुरत्या क्रेडिट मर्यादेचा विस्तार कालबाह्य झाला असेल तर आम्हाला आवश्यक असलेल्या कोणत्याही पेमेंटच्या व्यतिरिक्त क्रेडिट मर्यादेपेक्षा जास्त असलेल्या क्रेडिट कार्डच्या खात्यामधील शिल्लक असलेला तो भाग तुम्ही आम्हाला ताबडतोब देणे आवश्यक आहे.

4 आगाऊ रोख

आगाऊ रोख कशी मिळवायची

4.1 तुम्ही तुमच्या क्रेडिट कार्डचा वापर करुन आमच्या एखाद्या शाखेत, कार्ड असोशिएशनचा लोगो प्रदर्शित करणाऱ्या इतर वित्तीय संस्था आणि कोणत्याही ठिकाणी आगाऊ रोख रक्कम मिळवू शकता.

आगाऊ रोख रकमेची कमाल मर्यादा

4.1 आगाऊ रोख केवळ ॲडव्हान्स परमिट प्रदान करणाऱ्या व्यक्तीला कमाल मर्यादेपर्यंत उपलब्ध आहे. आम्ही परवानगी देत असलेल्या कमाल रकमेच्या तपशीलांसाठी आमच्याशी संपर्क साधा.

5 बॅलेन्स ट्रान्सफर

5.1 आपण विनंती केल्यास निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अटींच्या अधीन राहून आम्ही शिल्ल रक्कम ट्रान्सफर करण्यास परवानगी देऊ शकतो.

5.2 जोपर्यंत आम्ही खाते जमा झाल्याची पुष्टी करत नाही तोपर्यंत ज्या खात्यातून शिल्लक रक्कम ट्रान्सफर करता त्या खात्यात तुम्ही आवश्यक पेमेंट करणे सुरु ठेवू शकता. तुम्ही ज्या खात्यातून शिल्लक रक्कम ट्रान्सफर करता त्या खात्याशी संबंधित कोणत्याही थकीत पेमेंट किंवा व्याजासाठी आम्ही जबाबदार राहणार नाही.

6 व्याज, शुल्क आणि प्रभार

6.1 व्याज, शुल्क आणि प्रभार (वित्त प्रभार, आगाऊ रोख शुल्क, अत्याधिक शुल्क, वार्षिक शुल्क आणि प्रशासकीय शुल्कासहित) जकातीच्या यादीमध्ये नमूद केले आहेत.

6.2 अन्यथा निर्दिष्ट केल्याशिवाय, व्याजाची गणना वर्षाच्या 365 दिवसांच्या आधारावर केली जाते (लीप वर्षाच्या बाबतीत 366 दिवसांचे वर्ष मानावे) आणि मासिक आधारावर किंवा आम्ही निवडलेल्या इतर आधारावर चक्रवाढ केली जाते.

6.3 थकबाकी पूर्ण भरल्याच्या दिनांकापर्यंत व्याज आकारले जाते.

6.4 मागणीनुसार क्रेडिट कार्डच्या संबंधात आम्ही घेतलेले कर्ज वसुली शुल्क अशाप्रकारचे सर्व खर्च तुम्ही भरले पाहिजेत.

7 दायित्व

सामान्य

7.1 तुम्ही यासाठी जबाबदार आहात:

- आमच्या बँकेच्या कराराच्या अटींचे पालन करण्यात तुम्हाला किंवा कोणत्याही कार्डधारकाला कोणत्याही प्रकारचे अपयश आल्यास:
- कोणताही विवाद किंवा दावा असूनही क्रेडिट कार्ड वापरुन केलेले सर्व व्यवहार, तुम्ही विवादित व्यवहारांव्यतिरिक्त करु शकता जेथे तुम्ही किंवा कार्डधारक आमच्या बँकिंग कराराच्या अटींचे पालन करण्यात अपयशी ठरता;
- कोणताही विवाद किंवा दावा असूनही क्रेडिट कार्ड वापरुन केलेले सर्व व्यवहार, तुम्ही विवादित व्यवहारांव्यतिरिक्त करु शकता जेथे तुम्ही ग्राहक अटींच्या कलम 17 नुसार अन्यथा अपयशी ठरता;
- क्रेडिट कार्डच्या खात्यासाठी देय असलेली शिल्लक रक्कम (कोणत्याही सप्लिमेंटरी क्रेडिट कार्डसाठी खात्यात डेबिट केलेल्या आणि जमा केलेल्या सर्व रकमांसह); आणि
- जर तुम्ही आम्हाला व्यवहाराबद्दल सूचित केले नाही आणि आवश्यक असलेल्या कालावधीत आम्हाला आवश्यक असलेले कोणतेही दस्तऐवज किंवा माहिती प्रदन केली नाही तर अशा कोणत्याही व्यवहारात आम्ही अन्यथा चार्जबॅक अधिकार वापरु शकतो.

तुम्ही आणि सप्लिमेंटरी कार्डधारक यांच्यामधील वाद

7.2 तुमच्या आणि सप्लिमेंटरी कार्डधारकांच्या एकमेकांविरुद्ध असलेल्या वादामुळे किंवा दाव्यामुळे तुमच्याशी आणि प्रत्येक सप्लिमेंटरी कार्डधारकांशी संबंधित आमचे हक्क आणि दायित्वे प्रभावित होत नाहीत.

सेवा आणि वस्तूंची खरेदी

7.3 आम्ही यासाठी जबाबदार राहणार नाही:

- क्रेडिट कार्ड स्वीकारण्यास कोणत्याही व्यापारी, वित्तीय संस्था किंवा इतर व्यक्तीचा नकार; आणि
- कोणत्याही व्यापारी, वित्तीय संस्था किंवा इतर व्यक्तीने तुम्हाला पुरवलेल्या वस्तू किंवा सेवांमध्ये कोणताही दोष किंवा कमतरता.

तुम्ही कोणत्याही व्यापारी, वित्तीय संस्था किंवा इतर व्यक्तींविरुद्धच्या कोणत्याही तक्रारीचे निराकरण करणे आवश्यक आहे आणि त्यांच्यापैकी कोणाच्याही विरुद्ध असलेला कोणताही दावा आमच्याविरुद्ध केला जाऊ शकत नाही.

क्रेडिट कार्डसह देऊ केलेल्या तृतीय पक्ष सेवा

7.4 काही प्रकारचे क्रेडिट कार्ड्स तुम्हाला तृतीय पक्षांद्वारे प्रदान केलेल्या आणि देय असलेल्या सेवा वापरण्याची अनुमती देतात. उदाहरणार्थ, जर तुमच्याकडे व्हिसा गोल्ड कार्ड किंवा व्हिसा प्लॅटिनम कार्ड असेल तर तुम्ही आंतरराष्ट्रीय आपत्कालीन सेवा प्राप्त करु शकता. या तृतीय पक्ष सेवा अंतर्गत प्रदान केलेल्या कोणत्याही वैद्यकीय, कायदेशीर किंवा इतर सेवांसाठी तुम्ही जबाबदार राहाल. तुम्ही मान्य करता की तृतीय पक्ष सेवा प्रदाते कार्डधारकांना सेवा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतात आणि कदाचित सेवा नेहमी उपलब्ध नसतील (उदाहरणार्थ, वेळ, अंतर किंवा स्थानामुळे) आम्ही किंवा तृतीय पक्ष सेवा प्रदाते किंवा वरील उदाहरणाच्या बाबतीत व्हिसा इंटरनॅशनल सर्व्हिस असोसिएशन कोणत्याही सेवेच्या बाबतीत किंवा सेवेच्या अनुपलब्धतेच्या बाबतीत तुमच्यासाठी कोणत्याही नुकसानीसाठी जबाबदार राहणार नाही.

7.5 इमर्जेन्सी कॅश विथड्रॉवल (आपत्कालीन रोख काढणे), रिप्लेसमेंट कार्ड (कार्ड बदलणे) किंवा क्रेडिट कार्डच्या संदर्भात आम्ही प्रदान करत असलेल्या इतर कोणत्याही सुविधांसाठी तत्काळ परिणाम देऊ शकत नसल्यास क्रेडिट कार्ड धारकांना इमर्जेन्सी कॅश विथड्रॉवलची सेवा मिळत असलेल्या कोणत्याही नुकसानीसाठी आम्ही जबाबदार राहणार नाही.

8. तुमच्या खात्यासाठी अतिरिक्त सेवा

8.1 आम्ही तुमच्या खात्यासाठी अतिरिक्त सेवा देऊ शकतो. यामध्ये रिवॉर्ड्स प्रोग्राम्स, बॅलेन्स ट्रान्सफर स्कीम्स, पेमेंट अरेंजमेंट्स, काड्‌र्स प्रोटेक्शन आणि आम्ही तुम्हाला सांगितलेल्या किंवा वेळोवेळी उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही सेवांचा समावेश असू शकतो. आमच्याशी संपर्क साधून तुम्ही उपलब्ध सेवांबद्दल अधिक जाणून घेऊ शकता.

ग्राहक अटींमध्ये आमच्यावरील तुमच्या दायित्वाशी संबंधित अतिरिक्त तरतुदी आणि आमच्या दायित्वावरील अपवर्जन किंवा मर्यादा समाविष्ट आहेत. उदाहरणार्थ, ''तुमची आमच्याप्रति नुकसानभरपाईची तरतुद'' आणि ''अपवर्नाचे दायित्व'' पाहा.

8.2 तुम्ही अतिरिक्त सेवांसाठी साइन अप केल्यास तुम्ही अतिरिक्त सेवांच्या अटींशी बांधील राहता. अतिरिक्त सेवांच्या अटी आणि आमच्या बँकिंग करारामध्ये कोणत्याही विसंगतीच्या मर्यादेपर्यंत, आमचा बँकिंग करार तोपर्यंत कायम राहिल, जोपर्यंत अतिरिक्त सेवांच्या अटी अन्यथा निर्दिष्ट करत नाहीत.

8.3 तुम्ही अर्ज दिल्यास आम्ही तुमचे विद्यमान क्रेडिट कार्ड नवीन क्रेडिट कार्डमध्ये अपग्रेड करु शकतो. नवीन कार्डच्या अपग्रेडसाठी खालील अटी विशेषतः लागू होतील.

8.3.1 तुमचे नवीन क्रेडिट कार्ड (अपग्रेड केलेले) तुम्ही अर्ज दिल्यानंतर 2 कामकाजाच्या दिवसांत तयार होईल.

8.3.2 तुमचे विद्यमान क्रेडिट कार्ड नवीन क्रेडिट कार्ड तयार केल्यानंतर 35 दिवसांपर्यंत सक्रिय राहिल, त्यानंतर विद्यमान क्रेडिट कार्ड सर्व व्यवहारांसाठी निष्क्रिय केले जाईल आणि रद्द केले जाईल.

8.3.3 तुमच्या विद्यमान क्रेडिट कार्डसाठी तोपर्यंत स्टेटमेंट तयार केले जाईल जोपर्यंत त्या क्रेडिट कार्डवरील सर्व थकबाकी पूर्ण होत नाहीत, जरी हा कालावधी 35 दिवसांपेक्षा जास्त असला तरी. उत्पन्न केलेल्या स्टेटमेंटनुसार थकबाकी रक्कम भरण्यासाठी तुम्ही विद्यमान क्रेडिट कार्डवर पैसे भरले पाहिजेत.

8.3.4 प्रायमरी आणि सप्लिमेंटरी कार्ड हे दोन्ही कार्ड समान प्रकारचे असतील आणि सप्लिमेंटरी कार्ड सक्रिय असेल तर सप्लिमेंटरी कार्ड सुद्धा अपग्रेड केले जाईल. जर कार्ड ईजीमायट्रिप क्रेडिट कार्ड किंवा रिवॉड्र्स क्रेडिट कार्डमध्ये अपग्रेट झाले असेल तर एमआयटीसी नुसार सप्लिमेंटरी कार्डधारकाकडून वार्षिक शुल्क आकारले जाईल.

8.3.5 नवीन क्रेडिट कार्डसाठी स्टेटमेंट जनरेशन आणि पेमेंट देय दिनांक अपग्रेड केलेल्या क्रेडिट कार्ड व्हेरिएंटच्या आधारावर बदलू शकतात.

8.3.6 विद्यमान क्रेडिट कार्डवर मिळालेले रिवॉर्ड पॉइंट स्वयंचलितपणे क्रेडिट कार्डवर ३५ दिवसांच्या आत ट्रान्स्फर केले जातील. तथापि जर नवीन अपग्रेड केलेले क्रेडिट कार्ड हे डिजिस्मार्ट क्रेडिट कार्ड, ईजीमायट्रीप क्रेडिट कार्ड, अल्टिमेट क्रेडिट कार्ड किंवा स्मार्ट क्रेडिट कार्ड असेल तर विद्यमान क्रेडिट कार्डवर मिळालेले रिवॉर्ड पॉइंट्स तुम्हाला नवीन कार्ड जारी केल्यापासून ३५ दिवसांच्या आत रिवॉर्ड ३६० पोर्टलवर रिडीम करावे लागतील आणि हे रिवॉर्ड पॉइंट नवीन अपग्रेड केलेल्या क्रेडिट कार्डवर ट्रान्स्फर केले जातील. विद्यमान क्रेडिट कार्डवर मिळालेला कॅशबॅक (लागू असल्यास) तुम्हाला रिवॉड्र्स ३६० पोर्टलवरुन ३५ दिवसांच्या आत रिडीम करावे लागेल आणि ते नवीन क्रेडिट कार्डवर ट्रान्स्फर केले जाणार नाही.

8.3.7 विद्यमान क्रेडिट कार्डवरील सर्व कर्ज खाती (ईएमआय आणि कार्डवरील कर्ज) चालू राहतील आणि जनरेट केलेल्या स्टेटमेंटनुसार थकबाकीच्या रकमेवर तुम्ही देय करणे आवश्यक आहे.

8.3.8 विद्यमान क्रेडिट कार्डवरील क्रेडिट कार्ड रिपेमेंट संबंधित सूचना (एसआय/एनएसीएच) नवीन क्रेडिट कार्डवर ट्रान्सफर केल्या जातील.

8.3.9 विद्यमान क्रेडिट कार्डवरील सर्व बिल पेमेंटच्या सूचनांचा बिलर पेमेंट जसे युटिलिटी बिल, टेलिकॉम बिले इ.) सेटअप नवीन क्रेडिट कार्डवर ट्रान्सफर केला जाणार नाही. तुम्हाला नवीन क्रेडिट कार्डवर सर्व बिलरची पुन्हा नोंदणी करावी लागेल.

9. पेमेंट्स

देय दिनांकानुसार पेमेंट

9.1 आम्ही तुमच्या क्रेडिट कार्डसाठी जारी केलेल्या स्टेटमेंटमध्ये दिलेल्या देय दिनांकाला किंवा त्यापूर्वी, स्टेटमेंटमध्ये सांगितल्यानुसार तुम्ही किमान देय रक्कम भरली पाहिजे.

9.2 कोणत्याही कारणास्तव आपल्याला आपले नियतकालिक स्टेटमेंट प्राप्त झाले नाही तरीही आपले दायित्व आमच्यावर कायम राहिल.

किमान पेमेंटची गणना

9.3 आम्ही आमच्या नेहमीच्या पद्धतीनुसार किमान पेमेंटची गणना करतो. कृपया तुमचे स्टेटमेंट पाहा किंवा अधिक माहितीसाठी आमच्याशी संपर्क साधा.

व्यवहारांचे चलन

9.4 कलम 10.1 च्या अधीन, क्रेडिट कार्ड वापरुन केलेला कोणताही व्यवहार भारतीय रुपयांमध्ये न केल्यास, आम्ही आमच्या नेहमीच्या व्यवहारानुसार आणि आमच्या बँकिंग करारानुसार व्यवहाराची रक्कम भारतीय रुपयांमध्ये रुपांतरित करु.

आम्ही पेमेंट कसे लागू करतो

9.4 आम्हाला देय करण्यासाठी मिळालेले पेमेंट्स लागू करु शकतो (परंतु तशी गरज नाही)

- कोणत्याही स्टेटमेंटवर शुल्क, प्रभार आणि व्याज दाखवला जातो; त्यानंतर
- स्टेटमेंटवर दर्शवलेली कोणतीही रोख शिल्लक; त्यानंतर

- स्टेटमेंटवर दर्शवलेली कोणतीही शिल्लक; त्यानंतर
- स्टेटमेंटवर कोणताही रोख व्यवहार दर्शवत (दर्शवला) नाही; त्यानंतर
- खात्यावरील इतर व्यवहार स्टेटमेंटवर दर्शवत (दर्शवले) नाही.

तुम्ही पैसे न दिल्यास काय होईल

9.6 जर आम्हाला देय दिनांकाला किंवा त्यापूर्वी क्रेडिट खात्याची शिल्लक रक्कम मिळाली नाही तर आम्ही टॅरिफ शीटमध्ये किंवा आमच्या बँकिंग करारामध्ये नमूद केल्यानुसार क्रेडिट कार्ड फायनांस प्रभारासाठी शुल्क आकारु आणि खात्यातून डेबिट करु.

9.7 आम्हाला देय दिनांकाला किंवा त्यापूर्वी किमान पेमेंट मिळाले नाही तर:

- टॅरिफ शीटमध्ये किंवा आमच्या बँकिंग करारामध्ये इतरत्र नमूद केल्यानुसार तुम्हाला लेट पेमेंट शुल्क भरावे लागेल;
- किमान पेमेंट भरेपर्यंत तुम्ही क्रेडिट कार्ड वापरु नये;
- आम्ही तुमच्या क्रेडिट कार्डचा वापर पूर्णपणे स्थगित शकतो.

आम्ही सांगितल्यास, पूर्ण पेमेंट करा

9.8 आमच्या बँकिंग कराराच्या इतर कोणत्याही मुदती असताना देखील, कोणत्याही वेळी तुम्ही देणे लागत असलेल्या कोणत्याही रकमेच्या तत्काळ पेमेंटची मागणी आम्ही करु शकतो, मग ते आधीपासून एखाद्या स्टेटमेंटमध्ये दाखवले असेल किंवा नसेल आणि मागणीच्या दिनांकानुसार देय असेल किंवा नसेल.

9.9 कलम 9.8 मध्ये नमूद केलेल्या रकमेवर व्याज देय आहे आणि आमच्या मागणीच्या दिनांकापासून सुरु होऊन पूर्ण पेमेंटच्या दिनांकापर्यंत दररोज जमा होते या आधारावर व्याजाची गणना त्याचप्रकारे तुमच्या खात्यावरील रोख रकमेवर केली जाते.

क्रेडिट कार्ड खात्यावरील परतावा

9.10 आम्ही फक्त या संबंधात क्रेडिट कार्डसाठी खात्यात परतावा जमा करतो:

- क्रेडिट कार्डने केलेला व्यवहार; किंवा
- क्रेडिट कार्डसाठी खात्यात केलेले पेमेंट; किंवा
- तुमच्यावर असलेले इतर कोणतेही क्रेडिट,

जेव्हा आम्हाला भारतात आणि आमच्या नेहमीच्या पद्धतीनुसार जमा करायची रक्कम मिळते.

स्टेटमेंट

9.11 तुमच्या स्टेटमेंटमध्ये त्रुटी आहे असे जर तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही स्टेटमेंटच्या दिनांकानंतर 21 दिवसांच्या आत त्रुटीच्या तपशीलासह आम्हाला लेखी कळवले पाहिजे. तुम्ही तसे केले नाही तर स्टेटमेंट बरोबर आहे असे आम्ही समजू.

9.12 आम्हाला तुमच्या क्रेडिट कार्डसाठी स्टेटमेंट जारी करण्याची गरज नाही जर:

- मागील स्टेटमेंटपासून तुमच्या क्रेडिट कार्डसाठी खात्यावर कोणताही व्यवहार नोंदवला गेला नसेल; आणि
- तुमच्या क्रेडिट कार्ड खात्यामध्ये विद्यमान स्टेटमेंटच्या दिनांकाला रुपये 250 पेक्षा कमी क्रेडिट शिल्लक असेल किंवा रुपये 100 पेक्षा कमी डेबिट असेल.

10 ओव्हरसीस व्यवहार

10.1 जर तुम्ही नेपाळ किंवा भूतानमध्ये क्रेडिट कार्डचा वापर केला, तर तुम्ही केवळ स्थानिक चलनांमध्ये किंवा भारतीय रुपयांमध्ये व्यवहार करण्यासाठी क्रेडिट कार्डचा वापर करु शकता, कोणत्याही विदेशी चलनात नव्हे.

10.2 तुम्ही परदेशात क्रेडिट कार्ड वापरत असाल आणि रक्कम तुमच्या परदेशी चलनाच्या पात्रतेपेक्षा जास्त असेल तर तुम्हाला दावा केलेल्या रकमेची परतफेड करावी लागेल. आम्ही एक्सचेंज कंट्रोल विभागाकडे याची तक्रार करु शकतो.

10.3 संबंधित नियामक प्राधिकरणांद्वारे लागू केलेल्या आर्थिक निर्बंधांचे पालन करण्यास स्टँडर्ड चार्टर्ड वचनबद्ध आहे. म्हणून आम्ही आमची उत्पादने आणि सेवा अशा निर्बंधाच्या अधीन असलेल्या देशांमध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वापरण्याची परवानगी देत नाही आणि या देशांचा समावेश असलेल्या व्यवहारांवर प्रक्रिया करत नाही.

कृपया लक्षात घ्या की तुम्ही फोन बँकिंग, फॅसिमाईल ट्रान्समिशन किंवा ईमेलद्वारे आमच्याशी संपर्क साधू शकणार नाहीत किंवा आमच्या वेबसाईट व ऑनलाईन बँकिंगची सेवा वापरु शकणार नाहीत तसेच तुम्ही अशा देशांमध्ये असल्यास आम्ही तुम्हाला आर्थिक सेवा प्रदान करु शकणार नाही. आम्ही अशा देशांचा समावेश असलेल्या पेमेंट किंवा व्यापार व्यवहारांवर देखील प्रक्रिया करणार नाही. आर्थिक निर्बंधाच्या अधीन असलेल्या देशांची वर्तमानातील सूची कृपया आमच्या या **https://www.sc.com** वेबसाईटवर पाहा.

11 रद्द किंवा समाप्त करणे

कसे समाप्त करावे

11.1 आम्ही कधीही हे करु शकतो:

- क्रेडिट कार्ड वापरण्याचा तुमचा अधिकार रद्द किंवा स्थगित करु शकतो किंवा क्रेडिट कार्डचे खाते बंद करु शकतो;
- तुम्ही क्रेडिट कार्डद्वारे करु शकत असलेल्या कोणत्याही व्यवहारास अधिकृत करण्यास नकार देऊ शकतो; आणि
- क्रेडिट कार्ड पुन्हा जारी करण्यास, नूतनीकरण करण्यास किंवा पुनर्स्थित करण्यास नकार.

असे करताना आम्ही तुम्हाला कोणतीही पूर्वसूचना किंवा कारण देणार नाही. तथापि, आम्ही केलेल्या कोणत्याही कारवाईबद्दल आम्ही तुम्हाला सूचित करतो.

11.2 तुम्ही आम्हाला लेखी सूचना देऊन कोणत्याही वेळी क्रेडिट कार्डचे खाते बंद करु शकता.

खाते बंद झाल्यावर काय होईल

11.3 तुम्ही किंवा आम्ही क्रेडिट कार्डचे खाते बंद केल्यास:

- तुम्ही आणि कोणत्याही सप्लिमेंटरी कार्डधारकाने क्रेडिट कार्ड (कोणत्याही सप्लिमेंटरी कार्डसह) किंवा क्रेडिट कार्डच्या संबंधित (कोणत्याही सप्लिमेंटरी कार्डसह) कोणतेही लाभ घेऊ नये व त्यास तुम्ही पात्र ठरणार नाहीत;
- तुम्ही आणि कोणत्याही सप्लिमेंटरी कार्डधारकाने क्रेडिट कार्ड (प्रत्येक सप्लिमेंटरी कार्डसह) अर्धे कापले पाहिजे, ज्यामुळे चुंबकीय पट्टी आणि होलोग्राम यापुढे व्यवहारात राहणार नाहीत; आणि
- क्रेडिट कार्ड संबंधित (कोणत्याही सप्लिमेंटरी कार्डसह) आमच्याकडे असलेली सर्व रक्कम तुम्ही तत्काळ भरली पाहिजे, ज्यात क्रेडिट कार्डच्या खात्यातील देय असलेली शिल्लक रक्कम आहे.
- अशा रकमेवर व्याज देय असून तुम्ही किंवा आम्ही क्रेडिट कार्डचे खाते बंद केल्याच्या दिनांकापासून ते पूर्ण पेमेंटच्या दिनांकापर्यंत तुमच्या खात्यातील आगाऊ रोख रकमेवर आणि दररोज जमा होण्याच्या आधारावर व्याजाची गणना केली जाते.

कार्डधारकाद्वारे सप्लिमेंटरी कार्डच्या वापराची समाप्ती

11.4 तुम्ही किंवा सप्लिमेंटरी कार्डधारक सप्लिमेंटरी कार्डचा वापर समाप्त करु शकता:

- आम्हाला लेखी सूचित करुन; आणि
- सप्लिमेंटरी कार्ड अर्धे कापून टाकून, जेणेकरुन चुंबकीय पट्टी आणि होलोग्राम यापुढे व्यवहारात राहणार नाहीत तसेच सप्लिमेंटरी कार्ड आम्हाला परत करुन.
- क्रेडिट कार्ड पुन्हा जारी करण्यास, नूतनीकरण करण्यास किंवा पुनर्स्थित करण्यास नकार.

असे करताना आम्ही तुम्हाला कोणतीही पूर्वसूचना किंवा कारण देणार नाही. तथापि, आम्ही केलेल्या कोणत्याही कारवाईबद्दल आम्ही तुम्हाला सूचित करतो.

15.5 जर सप्लिमेंटरी कार्ड आम्हाला परत केले नाही तर आम्ही सप्लिमेंटरी कार्डचा पुढील वापर टाळण्यासाठी हरवलेल्या कार्डांना लागू असलेल्या आमच्या प्रक्रियेनुसार लगेच कारवाई करु शकतो. सप्लिमेंटरी कार्ड वापरुन केलेल्या कोणत्याही व्यवहारांसाठी ती रक्कम परत मिळेपर्यंत किंवा हरवलेल्या कार्डांना लागू असलेल्या प्रक्रियांची अंमलबजावणी करण्यास आम्ही सक्षम होईपर्यंत तुम्ही जबाबदार असाल. अशा प्रक्रिया राबवण्यासाठी आम्ही कोणतेही शुल्क लागू करु शकतो.

स्थायी सूचना

11.6 तुम्ही क्रेडिट कार्डचे खाते बंद केल्यास क्रेडिट कार्डवरील कोणत्याही स्थायी सूचना रद्द करण्याची जबाबदारी तुमची असेल.

12 तफावत

12.1 आम्ही आमच्या बँकिंग करारामध्ये केलेले कोणतेही बदल तुम्हाला पटत नसतील, तर तुम्ही कलम 11 मधील प्रक्रियेनुसार क्रेडिट कार्डचे खाते बंद करु शकता.

12.2 आम्ही तुम्हाला आमच्या बँकिंग करारामध्ये कोणत्याही लागू कायद्यानुसार कोणत्याही बदलांबद्दल तुम्हाला सूचित केल्यानंतरही तुम्ही क्रेडिट कार्ड, क्रेडिट कार्डचे खाते किंवा पिन/पासवर्ड तसाच ठेवला असेल किंवा वापरत असाल तर तुम्ही आम्ही केलेल्या बदलांना सहमती दर्शवली आहे असे मानले जाईल.

12.3 तुम्ही क्रेडिट कार्डसाठी अर्ज करताना आम्हाला दिलेल्या माहितीवर आणि तुमच्या क्रेडिट कार्डच्या प्रत्येक वापरावर आम्ही विश्वास ठेवतो. हे व्यवहार योग्य, पूर्ण असावे आणि दिशाभूल करणारे नसावे. तुम्ही आम्हाला दिलेली माहिती चुकीची किंवा दिशाभूल करणारी आहे याची तुम्हाला जाणीव झाल्यावर 30 दिवसांच्या आत आम्हाला तुम्ही सूचित केले पाहिजे.

13 संशयास्पद व्यवहार

13.1 आम्ही संशयास्पद व्यवहार सहन करत नाही (आणि अशा परिस्थितीत आम्हाला तुम्हाला सूचित करण्याची गरज वाटत नाही.)

13.2 क्रेडिट कार्ड जप्त करण्यासाठी व्यापाऱ्यांना सूचित करण्याच्या उद्देशाने वॉर्निंग बुलेटिनमध्ये आम्ही क्रेडिट कार्डशी संबंधित कोणतीही माहिती प्रकाशित करु शकतो. तसे करण्यामागे आम्हाला कोणतेही कारण देण्याची गरज वाटत नाही.

13.3 क्रेडिट कार्डसंबंधी कोणतेही क्रेडिट किंवा फसवणूकीची जोखीम असल्याचे लक्षात आल्यास आम्ही खाते ब्लॉक करु शकतो.

13.4 एखाद्या प्राधिकारणाने आम्हाला तसे करण्याची विनंती केली, किंवा आम्हाला कायद्याने आवश्यक असल्यास किंवा कोणत्याही नियामक किंवा तसे करण्यासाठी कोणत्याही प्राधिकरणाशी केलेल्या करारानुसार, किंवा आम्हाला कोणत्याही लागू आदेश किंवा प्राधिकरणाच्या मंजूरीसह संबंधित अंतर्गत धोरणाचे पालन करण्याची आवश्यकता असल्यास आम्ही तुमच्या क्रेडिट कार्डचे खाते कधीही (आणि नंतर ब्लॉक काढून टाकू शकतो) ब्लॉक करु शकतो.

13.5 आदेश, नियामक किंवा प्राधिकारणांशी करार किंवा अन्यथा कोणत्याही अधिकारक्षेत्रात तुमचे कर दायित्व स्थापित करण्यासाठी आवश्यक असेल, अशा परिस्थितीत तुमची माहिती देशांतर्गत किंवा परदेशी नियामक किंवा कर अधिकाऱ्यांना देण्यासाठी लागू असलेल्या स्थानिक कायद्यांच्या अधीन राहून तुम्ही याद्वारे स्टँडर्ड चार्टर्ड बँक किंवा तिच्या कोणत्याही संबद्ध (शाखांसह) (एकत्रितपणे ''बँक'') संस्थांना संमती देता.

14 कार्डचे नूतनीकरण आणि बदल (रिन्यूव्हल)

तुम्ही मान्य करता की क्रेडिट कार्डचे खाते संपेपर्यंत तुम्ही क्रेडिट कार्डचे नूतनीकरण आणि बदल करण्यासाठी स्थायी विनंती केली आहे. तथापि क्रेडिट कार्डचे नूतनीकरण किंवा बदल असा कोणताही निर्णय आमच्या विवेकबुद्धीवर अवलंबून आहे.

15 जर तुम्ही परदेशी नागरिक असाल

जर तुम्ही कायमचे भारत सोडून परदेशी नागरिकत्व स्वीकारणार असाल तर तुम्ही हे करणे आवश्यक आहे:

- तुम्ही तसे करण्यापूर्वी आम्हाला सूचना द्या;
- क्रेडिट कार्डच्या तुमच्या सर्व खांत्यांतील असलेली शिल्लक परत करा; आणि
- क्रेडिट कार्डचे प्रत्येक खाते बंद करा (कलम 11.3 देखील पाहा)

16 शब्दांचा अर्थ

या अटींमध्ये वापरलेल्या मुख शब्दांची परिभाषा असलेल्या आमच्या ग्राहक अटी देखील तुम्ही पाहिल्या पाहिजेत. जर या अटींमध्ये परिभाषित केलेला शब्द आमच्या ग्राहक अटींमध्ये देखील परिभाषित केला असेल तर, या अटींमधील परिभाषा क्रेडिट काड्‌र्सच्या खात्यांच्या उद्देशांसाठी लागू होते.

बॅलेन्स ट्रान्सफर म्हणजे असा व्यवहार ज्यामध्ये आम्ही तुमच्या क्रेडिट कार्डमधून निर्दिष्ट केलेली रक्कम डेबिट करतो आणि दुसऱ्या वित्तीय संस्थेच्या क्रेडिट कार्डमध्ये ती रक्कम भरतो.

आगाऊ रोख म्हणजे क्रेडिट कार्ड वापरुन कोणत्याही चलनात जारी केलेली रोख.

को-ब्रँड कार्ड म्हणजे व्यावसायिक सहयोगी भागीदाराच्या संयोगाने आमच्याद्वारे जारी केलेले कार्ड.

क्रेडिट कार्डच्या खात्यासाठी क्रेडिट मर्यादा म्हणजे क्रेडिट कार्डच्या खात्यामध्ये थकबाकी ठेवण्यासाठी तुम्हाला पात्र असलेली कमाल रक्कम.

आमचा बँकिंग करार म्हणजे जेव्हा आम्ही तुमच्याकडून अर्ज स्वीकारतो तेव्हा तुमच्यामध्ये आणि आमच्यामध्ये तयार झालेला करार, या कराराच्या अटींमध्ये आमच्या ग्राहक अटी आणि या अटींचा देखील समावेश होतो.

क्रेडिट कार्डच्या खात्यासाठी सप्लिमेंटरी कार्ड म्हणजे, क्रेडिट कार्डसाठी तुमच्या खात्यावर कार्डधारक म्हणून तुम्ही अधिकृत केलेल्या व्यक्तीला जारी केलेले क्रेडिट कार्ड.

सप्लिमेंटरी कार्डधारक म्हणजे अशी प्रत्येक व्यक्ती जिला आपण सप्लिमेंटरी कार्ड जारी करतो.